# ओझरमध्ये १५ तलवारींसह एक जण ताब्यात

## ग्रामीण पोलीस : सापळा रचून पकडले

लोकमत न्यूज नेटवर्क

नारायणगाव : गोणीमध्ये १५ तलवारी घेऊन जाणाऱ्या एकास पुणे ग्रामीण पोलिसांनी सोमवारी सापळा लावून पकडले.

ग्रामीण दहशतवादविरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन मोहिते यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पुणे ग्रामीण दहशतवादविरोधी पथक व ओतूर पोलीस ठाणे यांनी संयुक्त कारवाई केली. सोमनाथ राजाराम साळुंके (वय २६, रा. धनगरवाडी, ता. जुन्नर) याला पोलिसांनी अटक केली आहे. साळुंकेवर यापूर्वी गुन्हे दाखल आहेत. तो कारखाना फाट्यावरून ओतूरच्या दिशेने दुचाकीवरून निघाला होता. एका गोणीमध्ये १५ तलवारी बांधल्या होत्या. या वेळी पोलिसांनी त्याला अटक केली. अर्जुन मोहिते, सहायक फौजदार विश्वास खरात, सुनील ढगारे, राजू पवार, किरण कुसाळकर, मोसिन शेख या पथकाने ही कारवाई केली.

